।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229574 | POST GRADUATION SECTION | Website: srtmun.ac.in
Ext. No. 143,153 | E-mail:dr.pg.srtmun@gmail.com

संदर्भ :पदव्युत्तर/पीएचडीकोर्सवर्क/उन्हाळी२०/२०१९–२०/३७६४ दिनांक : २९/०५/२०२०

विषय: **उन्हाळी– २०२० प्री. पीएच.डी कोर्सवर्क बाबत.**

## परिपत्रक

कोविड– १९ कोरोणा विषाणु संसर्गाच्या परिस्थितीमुळे संपुर्ण देशात दि. २४ मार्च २०२० पासुन लॉकडाउन घोषित करण्यात आलेला आहे त्यामुळे उन्हाळी २०२० करिता प्री.पीएच.डी कोर्सवर्क आयोजित करता आले नाही. सबब मा. कुलगुरू महोदयांनी सदर परिस्थिती विचारात घेउन उन्हाळी २०२० करिता पीएच.डी कोर्सवर्क ऑनलाईन पध्दतीने घेण्यास मान्यता दिलेली आहे.

या परिपत्रकान्वये सर्व संशोधन केंद्राचे प्रमुख तसेच संबंधिताना मा. कुलगुरू महोदयाच्या आदेशान्वये खालील प्रमाणे कळविण्यात येते.

१. उन्हाळी २०२० करिता पीएच.डी कोर्सवर्क दि. ०१ जुन ते ३० जुन २०२० या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सर्व संशोधन केंद्रानी आयोजित करावे. आर.ए.सी.च्या बैठकामध्ये पीएच. डी. च्या ज्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध करून दिलेले आहेत ( Certificate of Allocation ) तसेच ज्या विद्यार्थ्याना नोंदणी पत्र ( Confirmation Letter) मिळालेले आहे मात्र त्यांनी पीएच.डी कोर्सवर्कसाठी प्रवेश घेतला नाही असे विद्यार्थी या कोर्सवर्कसाठी प्रवेश घेउ शकतील. सर्व संशोधन केंद्रानी अशा विद्यार्थ्यांना पीएच.डी कोर्सवर्क पुर्ण करण्याची परवानगी दयावी.

२. दि. ०१ जुन ते दि. ०५ जुन २०२० हा कालवधीत संबंधित विद्यार्थ्यांनी संबंधित संशोधन केंद्राकडे ऑनलाईन नोंदणी करावी व दि. ०६ जुन ते दि. ३० जुन २०२० या कालावधीत कोर्सवर्कचे आयोजन संबंधित संशोधन केंद्रानी करावे. या कोर्सवर्कला नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित संशोधन केंद्रानी पदव्युत्तर विभागास पाठवावी तसेच या कोर्सवर्कला बसलेले व पुर्वी अनुर्तीण झालेले तसेच परिक्षा देउ शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परिक्षा आवेदन पत्र संचालक परिक्षा व मुल्यमांपन मंडळ यांच्या सुचनेनुसार परिक्षा विभागास पाठवावेत.

३. उपरोक्त प्रमाणे उन्हाळी २०२० करिता ऑनलाईन कोर्सवर्क आयोजित करणे ज्या संशोधन केंद्रास शक्य नाही त्यांच्यासाठी विद्यापीठाच्या वतीने श्री. गुरू गोबिंदसिघजी अंभियात्रिकी व

तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपूरी नांदेड या संशोधन केंद्रात ऑनलाईन पध्दतीने कोर्सवर्कचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित संशोधन केंद्रानी अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे आयोजित वरील संशोधन केंद्रास नोंदणी करण्यास कळवावे. महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.sggs.ac.in वर संपर्क करावा.

पी.एचडी. कोर्सवर्क शुल्क रू. २,०००/—संबंधित विद्यार्थ्यानी संबंधित संशोधन केंद्राकडे भरावे लागले. कोर्सवर्कचे परिक्षा शुल्क रू. ३००/—परिक्षा विभागास भरावे लागेल.

४. पुढील कोर्सवर्क हे शैक्षणिक वर्ष २०२०—२१ या शैक्षणिक वेळापत्रकात दर्शविलेल्या हिवाळी सुटीच्या कालावधीत आयोजित करण्यात येईल.

कृपया यांची नोंद घ्यावी व हि बाब सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणुन दयावी, ही विनंती.

स्वा/
सहा.कुलसचिव
पदव्युत्तरविभाग

**प्रत माहिती तथा कार्यवाहीस्तव.**

1. **संशोधन केंद्र प्रमुख सर्व मान्यता प्राप्त संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ**
2. **मा. संचालक श्री. गुरू गोबिंदसिंघजी अंभियात्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड**
3. **मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ यांना देउन विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे कोर्सवर्क विद्यार्थ्यांची परिक्षा घेण्या बाबत योग्य ती कार्यवाही करण्या बाबत संबंधिताना आदेशित करावे.**
4. **सर्व पीएच.डी संशोधक मार्गदर्शक व विद्यार्थी.**